Maya CARE Foundation
The next best thing to family

# माया केअर फाऊंडेशन

News Letter

✻ वार्तापत्र ✻

वर्ष : 5 वी• अंक : 1 ला
ऑक्टोंबर – डिसेंबर 2025
केवळ खाजगी वितरणासाठी विनामूल्य

# संपादकीय ...

आपण आता सन २०२५ च्या शेवटच्या तिमाहीत प्रवेश केला आहे. नुकतेच गणेशउत्सव आणि नवरात्रोत्सव सगळीकडे आनंदात आणि उत्साहात साजरे झाले आणि आपण सर्वजण येणाऱ्या दीपावलीच्या उत्सवासाठी वाट पहात आहोत. या वर्षीचा मान्सूनचा पाऊस १५ मे च्या सुमारास म्हणजे नेहमीपेक्षा ३ आठवडे लवकर सुरू झाला. दरवर्षी तो सप्टेंबर महिन्याच्या परतीचा मान्सून सुरू होतो. या वर्षी मात्र सप्टेंबर महिना संपला तरी पाऊस पडतो आहेचं. महाराष्ट्रातील जो भाग नेहमी दुष्काळी असतो त्या भागात या वर्षी सरासरी पेक्षा खुपच जास्त पाऊस झाला. मराठवाड्यात व मराठवाड्याच्या लगतच्या जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी मुळे पिके वाहून गेली, गुऱ्हे ढोरे वाहून गेली फळ बागांचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. महाराष्ट्र शासन केंद्रसरकारच्या सहकार्याने या विभागातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाईने त्यांच्या हालअपेष्टा कमीतकमी होती याची काळजी घेत आहे.

आजच्या धकाधकीच्या जीवनात सेवा हा शब्द आपणास नेहमीच ऐकू येतो. पण त्याचा अर्थ आपण किती खोलवर समजतो बरे. मायाकेअर फौंडेशन मध्ये सेवा ही केवळ मदत करणे एवढेच नसून ते सजीव मूल्य आहे. त्यामुळे व्यक्तीला स्वतःचा आत्मसन्मान जपता येतो .आणि आनंदात, उत्साहात आणि प्रतिष्ठा राखून स्वतःचे जीवन जगता येते आणि कुटुंबियात, परिसरात आणि एकंदर समाजात आपले स्थान निर्माण करता येते.

माया केअर फौंडेशन च्या कार्याचा गाभा आहे, जेष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्ती. माया केअर त्यांना त्यांच्या दैनंदिन आयुष्यात स्वावलंबी बनविते. पण ही सेवा केवळ शारीरिक मदतीपुरती मर्यादित नाही तर ती मानसिक, सामाजिक आणि भावनिक आधार देते. एखाद्या वृद्ध व्यक्तीस दवाखान्यात घेऊन जाणे तसेच रुग्णालयात दाखल झालेल्या व्यक्तीला सोबत करणे ही सेवा आहेच पण त्याचवेळी त्यांच्या आठवणी ऐकणे, त्यांना समजून घेणे हे सुद्धा तेवढेच महत्वाचे आहे . आपल्या संस्कृतीत सेवा परमो धर्मः असे म्हंटले जाते . पण आज सेवा ही केवळ दानधर्मापुरतीच मर्यादित राहिलेली आहे . अर्थात हा दानधर्म तर महत्वाचा आहेच पण केवळ तेवढ्यावरच न थांबता सेवा ही परस्पर सन्मानाची प्रक्रिया आहे. इथे मदत घेणारा आणि मदत देणारा समान आहेत. ही समता निर्माण करणे हेच खरे सामाजिक परिवर्तन आहे .

माया केअर फौंडेशन ही आता केवळ एक संस्था राहिलेली नसून ती आता एक चळवळ बनलेली आहे., जी समाजातील जेष्ठ नागरिक आणि दिव्यांग तरुण तरुणी यांना सन्मानाने जगता यावे यासाठी विविध कार्यक्रम राबविते. जेष्ठ नागरिक आणि दिव्यांग तरुण तरुणी याना केंद्रस्थानी ठेवून त्यांना मोफत सहाय्य करते. या वार्तापत्रात तुम्हाला आमच्या स्वयंसेवकांच्या अनेक प्रेरणादायी कथा वाचायला मिळतील, ज्यांनी आपल्या स्वतःच्या वेळेचा, कौशल्याचा आणि आपल्या अंतःकरणातील प्रेमाचा उपयोग करून अनेकांचे जीवन सुखदायी केले. आमचे एकच ध्येय आहे कि कोणत्याही जेष्ठ नागरिकाला तसेच दिव्यांग तरुण तरुणींना आपण उपेक्षित आहोत असे वाटू नये.

दीपावलीचा महत्वाचा सण आता काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. अंधारावर प्रकाशाचा विजय साजरा करताना आपण आपल्या सेवेच्या दिव्या मुळे अनेकांच्या आयुष्यात उजेड पसरवितो आहोत. माया केअरच्या प्रत्येक उपक्रमात एक दिवा आहे, समजुतीचा, सन्मानाचा,आणि आत्मनिर्भरतेचा.

या दिपावलीत आपण केवळ घर सजवू नये तर मनही सजवूया –सेवेच्या प्रकाशाने.

आपल्या छोटयाश्या कृतीने कोणाचे आयुष्य उजळून टाकूया. म्हणून या दिवाळीत आपण संकल्प करूया . सेवा ही आपल्या सणा सारखीच साजरी होईल. आनंदाने , एकत्रितपणे आणि प्रेमाने सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा.

# लाभार्थ्यांच्या प्रतिक्रिया

नमस्कार, दिपाली ताई तुम्ही मीना शुक्ला आजी ना व्हिडिओ कॉल वर एक तास दिल्याबद्दल खूप धन्यवाद. आज आजीच्या गाण्याची कला तुमच्यामुळे बाहेर आली आणि आज भरपूर वेळ त्यांनी तुमच्याशी गप्पा मारल्या. खरंच त्या खूप आनंदी आणि छान त्यांना वाटलं असाच त्यांचा मूड फ्रेश करण्यासाठी तुमचे खूप धन्यवाद आणि तुमच्या माया केअर सेवा चे खूप धन्यवाद .

मीना शुक्ला मुंबई ९९२०८६३४५९

***

सौ.अनुजा कदम तुमचं मनापासून खूप कौतुक वाटलं मला एका औषधाची तातडीची गरज होती तीन चार मेडिकल मध्ये ते मिळालं नाही आज मुसळधार पावसातून म्युनिसिपल हॉस्पिटल जवळील मेडिकल मधून तुम्ही मला ते आणून दिले खरोखर तुमची ही सेवावृत्ति कौतुकास्पद आहे.
पोलिओमुळे तुमचा एक पाय अधू आहे तरी सुद्धा तुम्ही जिद्दीने दुसऱ्यांच्या सेवेचं काम करत आहात.
तुमच्या ह्या कामासाठी तुम्हाला खूप खूप शुभेच्छा.
तुमच्या मुळेच मला माया केअर फाउंडेशन चे नाव समजले आणि त्यांच्या चांगल्या कामाविषयी माहिती मिळाली

जयश्री वझे मुंबई ९२०७८३७५१

***

माया केअर फाउंडेशन च्या स्वयंसेवीका डॉ. सुवर्णा आगटे यांनी जी निस्पृहपणे मला मदत केली त्याला तोड नाही. घरातील, कुटुंबातील व्यक्तीप्रमाणे, सख्या मोठ्या बहिणीसारख्या त्या मदतीला आल्या. अखंड अत्यंत मोलाचे मार्गदर्शनही केले. त्या स्वतः डॉक्टर आहेत. खंबीरपणे पाठीशी उभ्या राहिल्या. खूप बरं नसताना मला मानसिक आधार, दिलासा दिला. खरंच नावासारख्या आहेत. आजच्या कलि युगात असं असणं खूपच दुर्मिळ! आजही त्या इतक्या नवनवीन गोष्टी आत्मसात करत, शिकत समाजात सर्वांनाच आजही सेवा देत आहेत. खूप प्रेरणादायी आहे. सुवर्णाताईना शतायुष्य लाभो, आरोग्य लाभो हीच परमेश्वराच्या चरणी प्रार्थना

अहाना कुलकर्णी मनोलीकर. ९०४९९४८६०४

***

मी सुरेखा देशपांडे कराडमध्ये राहते. मी आणि माझे पती आम्ही दोघेही वयोवृद्ध आहोत. आम्हाला नेहमीच मदतीची गरज लागते. अशा वेळेस मुजम्मिल बागवान आणि जयकुमार सोनी सर हे खूप चांगल्या प्रकारे मदत करतात. पती बेडवरच असल्यामुळे त्यांना बीपी शुगर चा त्रास आहे त्यांना औषध गोळ्याची गरज पडते. जेवढे पैसे असतील तेवढेच औषधे आणावे लागतात. माया केअरचा हा उपक्रम छान आहे. कारण आजकाल गरीबाची मदत कोणी करत नाही. माया केअर व त्यांच्या टीमचे धन्यवाद.

सुरेखा देशपांडे सातारा ८७६६८०१७६१

***

आमच्या पुण्याच्या लाभार्थी वैशाली देशपांडे यांनी आमच्या स्वयंसेविका मृणालिनी देव यांच्यावर लिहिलेली कविता.

सखी माझी दारात उभी । हसत मुखाने सदनी प्रवेशली ।
नावातच आहे देवत्वाचा वास । तिच्या बोलण्या वागण्याचा ढंग आहे खास ।
शांत आहे मन तिचे । योगासनामुळे आरोग्यदायी तन तिचे ।
गोड खाण्याचा असे जरी तिला वावडे । वाणीत आहे मात्र माधुर्य आणि गोडवे ।
अध्यात्माचा सत्संग आमचा । चाले घड्याळाचे काटे पुढे पुढे आले ।
तथागत बौद्धांचे ज्ञान मला मिळे । भक्तीरसांचा सुगंध सर्वत्र परीमळे ।
माया केअर दुसरी माझी सखी । तिच्यामुळे मैत्रीचा हात मला मिळे ।
तिच्या कार्याला उदंड यश लाभो आता । हीच प्रार्थना जगन्नियत्याला करते जाता जाता ।

# माया केअर वृत्त

१. ७ ऑगस्ट २०२५ – आंबी, पानशेत (पुणे) येथील जनसेवा फाउंडेशनच्या वृद्धाश्रमास माया केअर स्वयंसेवकांनी भेट देऊन ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधला.

२. ९ ऑगस्ट २०२५ – रक्षाबंधन, गोपाळकाला आणि दहीहंडी हे सण विविध वृद्धाश्रमांत उत्साहात साजरे करण्यात आले. या कार्यक्रमात स्वयंसेवक अर्चना वाटारकर, विनिता महाजन आणि  निमोणकर यांनी सहभाग नोंदवला.

३. १३ ऑगस्ट २०२५ – चिंचवड येथील पुणे आय केअर सेंटरतर्फे आयोजित नेत्रशिबिराचे उद्घाटन स्वयंसेवक नंदू नारंग यांच्या हस्ते पार पडले.

४. १४ ऑगस्ट २०२५ – स्नेहस्पर्श व जनसेवा फाउंडेशन, पानशेत, पुणे येथे मकरंद निमोणकर व अर्चना वाटारकर यांनी पुस्तके भेट दिली. अर्चना वाटारकर स्नेहस्पर्शमध्ये नियमित सेवा देतात.

५. ११ सप्टेंबर २०२५ – अल्झायमर सपोर्ट ग्रुप आयोजित धन्वंतरी हॉलमधील कार्यक्रमात निमोणकर, सौ. अर्चना वाटारकर व हेमंत टिकेकर यांनी सहभाग घेतला. यावेळी माया केअरच्या कार्याची माहितीही उपस्थितांना देण्यात आली.

६. १३ सप्टेंबर २०२५ – माया केअर फाउंडेशनच्या संचालिका मंजिरी गोखले जोशी लिखित कशा कशाच्या नावाने या पुस्तकाचे प्रकाशन सुप्रसिद्ध अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते झाले.

७. मकरंद निमोणकर यांनी त्यांच्या केरळ दौऱ्यात सोबतच्या पर्यटकांना माया केअरची माहिती सांगितली. तसेच विद्याधर जोशी आपल्या मुलाकडे अमेरिकेत गेले असताना तेथील महाराष्ट्र मंडळात व पांडुरंग शास्त्री आठवले यांच्या स्वाध्याय परिवाराच्या सत्संगाच्या कार्यक्रमात माया केअरची माहिती सांगून त्यांच्या भारतातील पालकांना आवश्यक असेल तर त्याचा लाभ घ्यावा असे आव्हान केले.

८. ९ ऑगस्ट २०२५ रोजी पूर्ण भारतभरातील २५ पेक्षा जास्त वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना आमच्या स्वयंसेवकांनी राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा केला.

९. १५ ऑगस्ट २०२५ रोजी भारतातील २० पेक्षा जास्त वृद्धाश्रमातील वृद्धांसोबत भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा केला.

१०. २७ ऑगस्ट २०२५ गणेशोत्सवाच्या काळामध्ये २५ पेक्षा जास्त वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांकडून गणपतीची चित्रे रंगवून घेण्यात आली.

११. २८ ऑगस्ट २०२५ रोजी गणेश उत्सव काळात पुण्यातील चार वृद्धाश्रमांमध्ये गणपती अथर्वशिर्ष स्त्रोत्रांचे वाचन आमच्या स्वयंसेविका विनिता महाजन यांनी केले

माया केअर फाउंडेशनच्या या विविध उपक्रमांमुळे समाजात ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी जागरूकता वाढीस लागली असून स्वयंसेवकांचा सहभाग कौतुकास्पद ठरला आहे.

## श्रध्दांजली

**गेल्या तिमाहीत खालील लाभार्थी ज्येष्ठ नागरिकांचे निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.**



| श्री. रांगणेकर | शशिकांत लोंढे | श्री.विजय रानडे | सौ.मेधा केतकर |
|---|---|---|---|
| ०१ जून २०२५ | ०२ ऑगस्ट २०२५ | ३० जून २०२५ | ११ ऑगस्ट २०२५ |



# आमची बिंदू टीम : अपंगावर मात करून बाजी.

**१. अजय त्यागी. आग्रा (उत्तर प्रदेश)**



**अजय त्यागी**

अजयचा जन्म १५ ऑगस्ट १९९३ रोजी उत्तर प्रदेश मधील आग्रा शहरात झाला. त्याने इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग मध्ये डिप्लोमा पूर्ण केला आहे. त्याच्या संपूर्ण शिक्षणादरम्यान तो नेहमीच मेहनती आणि जिज्ञासू होता. त्याचे सॉफ्टवेअर इंजिनियर होण्याचे स्वप्न होते. परंतु आयुष्यात अचानक एक वळण आले, फेब्रुवारी २०१९ मध्ये एका अपघातात अजयला शारीरिक अपंगत्व आले. हा बदल त्याच्यासाठी अत्यंत कठीण होता. सुरुवातीला ही परिस्थिती स्वीकारणे कठीण होते, परंतु हळूहळू संयम, सकारात्मक विचारसरणी आणि कुटुंबाच्या पाठिंब्याने अजयने स्वतःला पुन्हा निर्माण केले. त्याला शिकायला मिळाले की परिस्थिती कितीही कठीण असली तरी, जर कोणी धाडसी राहिला तर नेहमीच नवीन मार्ग सापडू शकतात. अजय म्हणतो, अपंगत्व हा जीवनाचा शेवट नाही तर ते फक्त एक नवीन वळण आहे जे आपल्याला मजबूत बनवते. माया केअर फाउंडेशनमध्ये सामील झाल्यामुळे अजयच्या आयुष्यात मोठा बदल झाला. येथे त्याला केवळ कामाच्या संधीच मिळाल्या नाहीत तर आत्मविश्वास आणि समाजात योगदान देण्याची प्रेरणा देखील मिळाली. अजय सध्या एलिफंट कनेक्ट व बुक लॉन्च तसेच सोशल मीडिया प्रकल्पावर अतिशय चांगल्या प्रकारे काम करत आहे. अजयचा असा विश्वास आहे की , माया केअरने त्याला केवळ रोजगारच दिला नाही तर जीवनात एक नवीन ध्येय देखील दिले.

---

**२. आरती शेजवलकर, ठाणे.**



**आरती शेजवलकर**

आरतीचा जन्म १९८५ मध्ये ठाणे येथे मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. आरतीचे वडील एम एस ई बी मध्ये कनिष्ठ तंत्रज्ञ म्हणून कामाला होते. ते २०१८ ला रिटायर्ड झाले. आरतीची आई गृहिणी आहे. आरतीला जन्मापासूनच सेरेबल पाल्सी या आजारामुळे अपंगत्व आले. परंतु या अपंगत्वावर तिने मात करून सामान्य शाळा कॉलेजमधून वाणिज्य शाखेमध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. सोबतच एम.एस.सी.आय.टी, मायक्रोसॉफ्ट ऑफिस, टॅली यासारखे कॉम्प्युटर कोर्स तिने पूर्ण केले. २०१५ मध्ये ती व्हिज्युअल क्रिएशन्स भांडुप येथे अकाउंट असिस्टंट म्हणून नोकरीमध्ये रुजू झाली. तिथे काम करत असताना ती दररोज ठाणे ते भांडुप लोकलने प्रवास करायची. तिला या प्रवासामध्ये अनेक चांगले वाईट अनुभव आले. परंतु २020 साली आलेल्या कोरोना महामारी आणि लॉकडाऊन मुळे तिला नोकरी गमवावी लागली. नोकरी गेल्यानंतर पुढे काय करायचे असा प्रश्न तिच्यासमोर उभा राहिला. यामध्ये तिला २०२२ साली एका कंपनीमध्ये अकाउंट असिस्टंट म्हणून नोकरी लागली. परंतु तिथे काम करत असताना तिला कामाचा खूपच ताण पडत होता त्यामुळे शारीरिक त्रास जाणवायला लागला. त्यामुळे नाईलाजाने तिला ती नोकरी सोडावी लागली. त्यानंतर परत तिला चांगल्या जॉबची गरज होती म्हणून ती शोधाशोध करत असताना तिच्या एका मैत्रिणीच्या सल्ल्याने माया केअर फाउंडेशन मध्ये ट्रेनिंग पूर्ण केले व सप्टेंबर २०२२ ला माया केअर मध्ये रुजू झाली. सुरुवातीला तिने बिंदू प्रकल्पावर काम करायला सुरुवात केली . त्यानंतर तिने युसी प्रकल्पावरतीही काम केले. तिच्या कामाचा वाढता आलेख पाहून माया केअर च्या एच.आर. ज्योती मोरे यांच्यासोबत तिला पॅरोल प्रोजेक्टमध्ये काम करण्याची संधी मिळाली. सध्या ती या प्रकल्पामध्ये अतिशय चांगल्या प्रकारे अचूक पद्धतीने काम करत आहे. हे काम ती आनंदाने करत असल्याचे व या कामामुळे तिला आर्थिक मदत होत असल्याची तिने सांगितले. माया केअर ने तिला एक संधी दिल्याबद्दल ती माया केअर चे आभार मानते.

# स्वयंसेवकांचा अनुभव

त्या दिवशी माया केअर च्या ऑफिस मधून विलास काकांचा नंबर दिला गेला आणि मदतीची गरज आहे त्यांना संपर्क साधा असे कळविण्यात आले. फोन केल्यावर कळाले की काकांचे स्वतःचे डायलिसिस आठवड्यातून दोनदा असते आणि ते साधारण चार तास चालते. तिथे त्यावेळी त्यांना सोबतीची गरज असते.

त्यांना हो तर म्हणाले, पण आपल्याला एकट्याला जमेल का हा प्रश्न सतावू लागला. लक्षात आले की हे एकट्याचे काम नाहीये, टीमने मिळुन करण्याचे काम आहे. कारण ३ ते ४ तास, आठवड्यातून दोनदा आणि तेही विना खंड...

लगेचच पिंपरी चिंचवड मधले माझे सहकारी नंदु नारंग व चि . सिद्धेश पुराणिक यांना फोन केला व चर्चा केली, त्यांनाही ते पटले व बाकीच्या सेवा सांभाळून ज्याला जेव्हा वेळ असेल तेव्हा आलटून पालटून जाण्याचे ठरले व नंदु नारंग यांनी जाण्याचा श्री गणेशा केला. त्यानंतर सिद्धेश गेला आणि नंतर माझी वेळ आली.

डायलिसिस सेंटरमध्ये शांतता, एकदम सिरीयस वातावरण, तोंडावर मास्क कंपल्सरी आणि मास्कच्या आतून बोलतानाही हळू बोलायचे. पेशंटचे नातेवाईक/मदतनीस यांच्यासाठी त्या रूमच्या बाहेर बसण्यासाठी जागा होती. हॉस्पिटलच्या दिवसांतून तीन बॅचेस असायच्या, त्या बॅचचे सगळ्या पेशंटचे डायलिसिस एकाच वेळेस सुरू व्हायचे.

मग काय, कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण झाल्यावर पेशंट सोबतच्या सगळ्यांचा तिथे बाहेर गप्पांचा फड जमायचा आणि प्रत्येक जण आपापले अनुभव एकमेकांना सांगायचा.

गप्पा चालू असतानाच अधून मधून आत मध्ये चक्कर मारावी लागते, काकांना काही हवे आहे का, पाणी प्यायचे आहे का, खाऊचा डब्बा उघडून द्यायचा आहे का या प्रकारे...... , कधी लॅबमधून टेस्ट रिपोर्ट आणून द्यायला लागतात, कधी सलाईनची बाटली आणून द्यायला लागते.

काका सुद्धा आमची आपुलकीने चौकशी करतात की तुम्ही बाहेर काय करता, ३– ४ तास वेळ कसा घालवता, तुम्हाला करमते आहे ना, बाहेर कंटाळा तर येत नाही ना, काही खाल्ले का, चहा/ कॉफी घेतली का.....

फार कौतुक वाटते काकांचे की आमचीही त्यांना काळजी वाटतेय.

काका आधी मुंबईला राहत होते, तिथे त्यांना हॉस्पिटल कडून मदतनीस सोबत घेऊन येण्याचे बंधन नव्हते, पण आता पुण्यामध्ये शिफ्ट झाल्यानंतर इथे मदतनीस सोबत घेऊन या असे सांगण्यात आले. काकांचे इथे तसे ओळखीचे कोणी नाही, अशा वेळेला माया केअर फाउंडेशनच्या सेवेबद्दल कळाले व मदतीचा हात मिळाला व सोबतीचा एक मोठा प्रश्न सुटला.

माया केअर संस्थेचे खूप खूप धन्यवाद की अशा पद्धतीने वृद्ध/ ज्येष्ठ नागरिकांना सेवा देण्यात येते व मलाही त्याचा एक भाग होता आले.

स्वयंसेवक – गौरी क्षीरसागर (पिंपरी चिंचवड)

मायाकेअरच्या संस्थापक मंजिरी गोखले जोशी यांनी लिहिलेल्या " In the name of " या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन मुंबईत मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात झाले.

" In the name of " या पुस्तकाचे मराठी भाषांतर कशा कशाच्या नावाने या पुस्तकांचे प्रकाशन सुपसिद्ध अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते दिनांक १३ सप्टेंबर रोजी पुणे येथे झाले त्यावेळचा फोटो








अकोला येथील डॉ. पी. पी. देशमुख यांना सहवासासाठी मदत करत असताना आमची स्वयंसेवका स्वाती कांबळे

समाधान केअर सेंटर नागपूर येथे स्वयंसेवक सोनाली ठाकरे यांच्या पुढाकाराने ज्येष्ठ नागरिकांसोबत आनंदात स्वातंत्र्यदिन साजरा





मुंबई येथील शोभा कदम यांना बाजारातून किराणा आणण्यासाठी मदत करत असताना आमची स्वयंसेविका नंदा पंडित

राधिका वृद्धाश्रम मुंबई येथे स्वयंसेवक श्वेता दवणे व रुपाली वाडके यांनी ज्येष्ठ नागरिकांसोबत रक्षाबंधन साजरे करून मनोरंजनाचा आनंद लुटला.





मुंबई येथील श्रीमती पार्वती पांडे यांना बागेत फिरण्यासाठी मदत करत असताना आमची स्वयंसेविका शिल्पा नाईक



अहमदनगर येथील ताराबाई देठे यांना रुग्णालयात जाण्यासाठी मदत करत असताना आमची स्वयंसेविका उषा काळे



छ. संभाजीनगर (औरंगाबाद) येथे औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत वरिष्ठ नागरिकांची केवायसी फॉर्म भरण्यासाठी मदत करत असताना आमचे स्वयंसेवक संदीप शिंदे

मुंबई येथील प्रदीप मालगी यांना माईक खरेदीसाठी मदत करत असताना आमचे स्वयंसेवक संदीप परेख





जालना येथील बंदास जानकीराम पाटली दासपूते यांना बाजारातून भाज्या आणण्यासाठी मदत करत असताना आमचे स्वयंसेवक सतीश इंगळे.

पुणे कोथरूड येथील निला डी. फडके यांना सह्याद्री रुग्णालयात मदत करत असताना आमच्या स्वयंसेविका सुवर्णा आगटे





पुणे येथील श्रीमती कल्पना गवांदे यांच्यासोबत बागेत फिरत आनंददायी वेळ घालवत असताना आमची स्वयंसेविका गौरी क्षीरसागर

नागपूर येथे सेवाधाम स्वामी समर्थ वृद्धाश्रमात गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. ज्येष्ठ नागरिकांनी आनंदाने गणपतीची रंगीत चित्रे रंगवून उत्सवाची शोभा वाढवली आमचे स्वयंसेवक प्रकाश सय्यारे आणि वैशाली टुपकर.





पुणे येथील श्री. सुधीर देशपांडे यांना गणेश मूर्ती पोहोचविण्याचे करत असताना आमचे स्वयंसेवक मकरंद निमोणकर



पुणे येथे कृपासिंधु वृद्धाश्रम, कृष्ण जन्माष्टमी निमित्ताने आनंद सोहळा साजरा केला आमची स्वयंसेविका विनीता महाजन



पुणे येथील श्री. केशव पाटवर्धन काकांची त्यांच्या सिंगापूरहून आलेल्या मुलासोबत गप्पांची मैफल जमली.
स्वयंसेवक
अरुणा अवतारमणी



पुणे येथे स्नेहस्पर्श वृद्धाश्रम, कर्वेनगर येथे गणेशोत्सवाची आरती वरिष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडली.
स्वयंसेवक विनीता महाजन

Maya CARE Foundation

The next best thing to family

भावनिक/बौद्धिक /औपचारिक समर्थनासाठी वरिष्ठ नागरिकांना
मोफत 90 मिनिटांच्या भेटी

**✻ सेवा ✻**

त्यांना डॉक्टर / रेडियोथेरेपी / लसीकरण / सामाजिक कार्यक्रम
थिएटर / बँक / कागदपत्रे / लेखन / वाचन / खरेदी /
गॅझेटस वापरणे / व्हिडिओ कॉल करण्यात मदत

## MAYA CARE NATIONAL HELPLINE : 1800 572 1343

| CITY | FOR WHATSAPP |
|---|---|
| मुंबई,पुणे,कोल्हापूर,सांगली,सातारा,सोलापूर,लातूर, नागपूर,नाशिक,परभणी,अहमदनगर,छ.संभाजीनगर,जालना,जळगाव,धुळे,अमरावती,वर्धा,अकोला,बुलढाणा,यवतमाळ, चंद्रपूर,बीड,नंदुरबार,बेंगलोर,हैदराबाद,चेन्नई,दिल्ली,सुरत,वडोदरा,अहमदाबाद,गांधीनगर,कच्छ,चंदीगड,जालंधर,लुधियाना,अबोहर,जबलपूर,उज्जैन,भोपाळ,छतरपुर,ग्वाल्हेर ,इंदोर,रीवा,झांसी,लखनऊ,कानपूर,कोइंबतूर,पाँडिचेरी,पानिपत,गुवाहाटी,हहलखंडी,भुवनेश्वर,अंगूल,संबलपूर,जयपुर,जोधपुर,उदयपूर,ढोलपूर,जैसलमेर,बराण,कोची, तिरुअनंतपुरम,कोलकत्ता,पूर्व मिदनापूर,पश्चिम मिदनापूर,हावडा,बांकुरा,मालदा,उत्तर २४ परगणा,हरिद्वार,डेहराडून, इंग्लंड-लंडन, केंब्रिज, मिल्टन केन्स, मँचेस्टर. | 9552510400<br>9552510411<br>8055995966 |

**Website - www.mayacare.org | Email : service@mayacare.org**

तुम्ही ज्येष्ठ नागरिक आहात आणि तुम्ही एकटे किंवा दुकटे राहात आहात किंवा जेष्ठ नागरिक आहात आणि कुटुंबात राहात आहात पण अपंग आहात तर आम्ही आपल्याला संपूर्णपणे मोफत मदत करू शकतो:

१) किराणा , भाजी , फळफळावळ, औषधे आणून देणे .
२) डॉक्टरकडे घेऊन जाणे, आपण रुग्णालयात दाखल असल्यास आय सी यु च्या बाहेर थांबणे .
३) आपल्याला धार्मिक किंवा इतर पुस्तके, वृत्तपत्रे वगैरे वाचून दाखविणे, लेखन करणे .
४) आपल्या बँकेत जाऊन पैसे काढणे ,पैसे भरणे, चेक भरणे .मुदत ठेव नुतनीकरण करणे
५) आपल्याला एसटी स्टँड , रेल्वे स्टेशन , विमानतळ येथे पोंहचविणे किंवा तेथून घरी सुखरूप पोहचविणे .
६) मोबाईल फोन वापरणे , कॉम्प्युटर वापरणे इत्यादी साठी मदत करू .
७) वृद्धाश्रमात जाऊन मदत करू. या शिवाय इतर अनेक गोष्टीसाठी आम्ही तुम्हाला मदत करू.
८) दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल पुणे, लायन ताराचंद बापा हॉस्पिटल मुंबई, जनरल हॉस्पिटल के आर पुरम बंगलोर, सरदार वल्लभ भाई पटेल हॉस्पिटल, नवी दिल्ली, सेंटर पॉईंट हॉस्पिटल नागपूर , के डि एम सी हॉस्पिटल मुंबई येथे विनामुल्य रुग्ण सेवा.

देणगीसाठी **QR Code**

**माया केअर कोणतीही आर्थिक मदत, जलद सेवा आणि नर्सिंग सुविधा देत नाही**

## ✻ आपले अभिप्राय व सुचना यांचे स्वागत आहे. आपण ई-मेल करुन कळवू शकता.

**देणगीसाठी आयकर सवलत आहे.**

**NAME OF THE A/C - MAYA CARE FOUNDATION**

**NAME OF THE BANK : ICICI BANK LIMITED** (BRANCH : TILAK ROAD,PUNE)
**ACCOUNT NO. : 187501000462**
**IFSC CODE : ICIC0001875**

**PRINTED MATTER**

बुक-पोस्ट

FROM,

**माया केअर फाऊंडेशन**
1214 शुक्रवार पेठ, आफ्रिका हाऊस,
सुभाषनगर, गल्ली नं.04, पुणे - 411002.

केवळ खाजगी वितरणासाठी / विनामूल्य

Printed At - Sane & Shinde Associates
Tel.: 020-24477059

TO,

श्री/श्रीमती ____________________

____________________

____________________

____________________

____________________